# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ 1486 /सीटीसी, पीएचओ एण्ड बीएमटीसी    दि. 15.08.2018

## जाहिरात

थेट मुलाखत (Walk in Interview)

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कॉम्प्रिहेन्सीव थॅलेसेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू.) (लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय, शीव, अंतर्गत) येथील केंद्रासाठी खालील विविध रिकत पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | पदाचे नाव | अर्हता | पद संख्या | वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | परिचारीका (कंत्राटी पद्धतीने) Staff Nurse | G.N.M. Nursing, Registration with Maharashtra Nursing Council -Necessary | 1 | 22000/- |
| 2 | चतुर्थश्रेणी कामगार IV Class Employee | 10th pass | 3 | 9000/- |

6 महिन्याच्या रजेच्या कालावधीकरीता

| अनु क्र. | पदाचे नाव | अर्हता | पद संख्या | मा॥सिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.Sc., DMLT | 1 | 20000/- |

**वयोमर्यादाः-**

1. परिचारिकाः कमाल वयोमर्यादा 40 वर्षापर्यंत.
2. चतुर्थश्रेणी कामगारः कमाल वयोमर्यादा 40 वर्षापर्यंत.
3. प्रयोगशाळा तंत्रज्ञ:- कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यंत.

**सर्वसाधारण अटीः-**

1. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परिक्षा वा तत्सम किमान 50 गुणांची प्रश्न प्रत्रिका असलेला मराठी विषय, घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
2. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MSCIT OR GECT चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे किंवा नेमणूक झाल्यावर दोन वर्षाच्या कालावधीत संगणक विषयक उपरोक्त अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
3. उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहा पूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.
4. उमेदवाराने पदविका/पदवी परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नांत उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
6. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
7. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
8. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
9. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
10. निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
11. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकी नंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
12. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
13. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.
14. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे. अन्यथा त्यांना एक महिन्याचा पगार नोटीस पे म्हणून महानगरपालिकेत जमा करावा लागेल.

**<u>विशेष सुचना :</u>**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) जाहिरातीची सुचना त्याचप्रमाणे मुलाखतीचा कार्यक्रम कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्राच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

अर्जाचे विहित मुल्य अनु क्र.1 ते 3 साठी रु. 100 + 5 GST कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066 येथे दि. 17.09.2018 ते दि. 27.09.2018 रोजी (सार्वजनिक सुट्टी व रविवार वगळून) (स. 9.00 ते दु. 2.00 पर्यंत) भरून, त्याची पावती अर्जासोबत जोडावी. पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066. येथे शुक्रवार, दि. 28.09.2018 रोजी स. 09.00 वाजता थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) उपस्थित रहावे.

सही/-
संचालक
सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र

सही/-
<u>संचालक (वै.शि. व प्र.रु.)</u>